**अनुदानित खतांचे उत्पादक/पुरवठादार कंपन्यांकडून विना अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके इ. यांच्या विक्रीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : कृवपदुम-२८०१६/११८/२०२६-MAG-१७ A (१६४६१३८)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, विस्तार, मुंबई ४०००३२.
दिनांक :- २० मे, २०२६

**संदर्भ :-**

1. मा.मंत्री (कृषी) यांचे अध्यक्षतेखालील बैठकीचे इतिवृत्त दि.२८/०४/२०२६.
2. कृषी संचालक यांचे पत्र क्र.गुनियो/राखते/गुनि ७-८/११६३/२०२६ दि.३०/०४/२०२६.

**शासन परिपत्रक :-**

राज्यातील शेतकरी, लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स अँड सीड्स डिलर्स असोसिएशन, पुणे यांचेकडून प्राप्त निवेदने व तक्रारींच्या अनुषंगाने, राज्यात काही उत्पादक/मार्केटिंग कंपन्यांकडून अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विना-अनुदानित खते व इतर कृषी निविष्ठांची सक्तीने विक्री (Tagging/Linking) केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच भारत सरकार, रसायने व खते मंत्रालय, खते विभाग यांच्या संयुक्त सचिव (खते) यांनी निर्गमित केलेल्या D.O. No. २४-०१/२०२०-FM, दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ अन्वये खत कंपन्यांकडून खतांसोबत इतर उत्पादनांचे टॅगिंग (Tagging) करणे बेकायदेशीर व अन्यायकारक असल्याचे कळविले आहे.

2. शेतकऱ्यांचे हित व तातडी विचारात घेता, राज्यामध्ये अनुदानित खतांचे उत्पादक / पुरवठादार कंपन्या यांना अनुदानित खताची विक्री व पुरवठा करणेबाबत देण्यात आलेल्या परवान्यातील अनुदानित रासायनिक खते सोडुन इतर विना-अनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके इ. चा पुरवठा व विक्री करण्यास तात्काळ प्रभावाने मनाई करण्यात येत आहे.

3. त्यानुषंगाने आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संबंधित खत उत्पादक / पुरवठादार कंपन्या व अधिनस्त कार्यालये यांना सुचना द्याव्यात. तसेच निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येवून टॅगींग /लिंकींग करीत असल्याचे निर्देशनास आल्यास संबंधितांवर नियमोचित कठोर कारवाई करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५२०१६३८२९५३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
PARIMAL SINGH
Date: 20-05-2026
17:51:02
**( परिमल सिंह )**
**सचिव (कृषि), महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

1. मा.राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
2. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
3. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास), यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

4. मा.उपमुख्यमंत्री (उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक व क्रिडा) यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
5. मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
6. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
7. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
8. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य.
9. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
10. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
11. उपसचिव (17-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
12. कृषि संचालक (नि. व गु. नि.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
13. १७-अे कार्यासन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई (निवडनस्ती)